■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ६ ● मंगळवार, दि. २४ जुन ते १ जुलै २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

■ जि. प. सीईओ वैभव वाघमारे यांची माहिती

## जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींची होणार तपासणी

**वाशिम, दि. २४: स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमास सुरुवात झाली आहे. याअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील ४९१ ग्रामपंचायती अंतर्गत ६८१ गावांमध्ये स्वच्छता विषयक तपासणी होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिली आहे.**

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण २०२५ चे नुकतेच राज्यस्तरीय शुभारंभ झाला असुन आता जिल्हास्तरावर या अभियानाची अंमलबजावनी करण्यात येत आहे. यामध्ये गावांतील स्वच्छतेची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार असून त्यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर, दृष्यमान स्वच्छता, ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण, घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, खतखड्डे, प्लास्टिक संकलन व त्याचे व्यवस्थापनाची पाहणी करण्यात येणार आहे. यादरम्यान घरोघरी भेट देऊन नागरिकांच्या स्वच्छतेविषयक सवयी, शौचालय वापर, कचरा व्यवस्थापन, हात धुण्याच्या सवयी, तसेच परिसरातील एकूण स्वच्छतेचा आढावा घेतला जाईल.

यासोबतच शाळा, अंगणवाडी, बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक शौचालये या सारख्या सार्वजनिक संस्थांमध्ये स्वच्छता राखलेली आहे का, याचीही पडताळणी केली जाणार आहे. या सर्वेक्षणाला सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पाणीपुरवठा समित्या आणि ग्रामस्थांनी एकजुटीने सामोरे जावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्रीराम कुळकर्णी, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंदरे, ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, महिला व बाल विकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणविर यांनी केले आहे.

संपुर्ण स्वच्छता का संकल्प
स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५
जिल्हा परिषद, वाशिम

### या विभागांचा समावेश

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण हा केवळ स्वच्छता विभागाशी संबंधीत नुसुन त्यामध्ये पंचायत विभाग, शिक्षण, आरोग्य, एकात्मिक बाल विकास विभाग, पाणी पुरवठा या विभागांचा समावेश आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या माध्यमातुन गावात तपासणी होत असतांना सर्व विभागांनी आपापसात समन्वय ठेवणे अपेक्षित आहे.

### १००० गुणांच्या आधारे मूल्यांकन

या सर्वेक्षणासाठी एकूण १००० गुणांची मूल्यांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे, ज्यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन १२० गुण, ग्रामस्थांचा प्रतिसाद व मानसिकतेतील बदल-१०० गुण, स्वच्छता सुविधांचा वापर-२४० गुण व प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावली- ५४० गुण असे एकूण १००० गुणाचे मुल्यांकन राहणार आहे.

## भा.मा.कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक योग दिन साजरा



**रिसोड - स्थानिक भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक २१ जून रोजी मोठ्या उत्साहात व आनंदात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माननीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम व नवनियुक्त पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.**

तसेच विशेष करून योगा शिक्षक माजी पर्यवेक्षक आदरणीय विलासराव देशमुख सर यांनी प्राचार्या, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक ,शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच असंख्य विद्यार्थीनी यांच्या समवेत योग शिक्षणाचे उत्तम प्रकारे धडे दिले व उत्तम योगासने करून सुद्धा घेतले. तसेच भा.मा. कन्या शाळा व कनिष्ठमहाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख यांनी योग उत्तम आरोग्यासाठी किती महत्वाचा आहे. जीवन निरोगी ठेवायचे असेल तर रोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे सूचक विधान आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तसेच पर्यवेक्षक सुनील डहाळके सर यांनी सुद्धा योगावर आपले विचार व्यक्त करताना योग हा जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे व्यक्त केले. प्राचार्या, पर्यवेक्षक, शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांनी योगाचा मनमुरादपने आनंद घेतला.

## भारत प्राथमिक मराठी शाळेत 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा

रिसोड : येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत २३ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेसमोर रांगोळी काढून ,पताका लावून विद्यार्थ्यांच्या स्वागताची तयारी करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी भूषवले तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षक पंजाबराव देशमुख, ज्योती दुबे आदी मान्यवर उपस्थित होते .सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यांनतर मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी शाळेत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून, चॉकलेटचा खाऊ व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले . याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे कागदावर उमटवून, शाळेतील पहिल्या दिवसाची आठवण म्हणून पालकांना देण्यात आले.

विद्यार्थ्यांकरिता विशेष सेल्फी कॉर्नर चे आयोजन करण्यात आले. तसेच मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले . यावेळी




मुख्याध्यापिका किरणताई दुबे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की ,शाळेचा प्रारंभ चैतन्यमय व उत्साहवर्धक वातावरणात झाल्यास शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीस गती मिळते ही संकल्पना लक्षात घेऊन शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात येतो.शाळा प्रवेशोत्सवामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आत्मीयता निर्माण होते. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. असे मुख्याध्यापिका किरणताई दुबे यावेळी म्हणाल्या.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक धनंजय वाघ यांनी केले. सदर कार्यक्रमास शिक्षक, पालक ,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## भारत माध्यमिक शाळा रिसोड येथे प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

रिसोड : येथील भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत सत्र २०२५-२६ या नवीन शालेय सत्रात विद्यार्थ्यांचा प्रवेश व स्वागत उत्सव अतिशय उत्साहात पार पडला.

शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार नवीन सत्राच्या पहिल्याच दिवशी म्हणजे २३/०६/२०२५ सोमवारला शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच शाळेचे नियमित



विद्यार्थी यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार शाळेचे प्राचार्य श्री संजय भांडेकर,उपप्रचार्य श्री संजय शर्मा व पर्यवेक्षक श्री ज्ञानेश्वर थोरात यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन पार पडला. याप्रसंगी पाचव्या वर्गात नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पुस्तकाचे वाटप करण्यात आले

तसेच त्यांना गणवेश प्रदान करण्यात आला. यानंतर शाळेचे प्राचार्य श्री संजय भांडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी नवीन सत्रात शाळा कोणते उपक्रम राबवणार व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून शाळेची नवीन धोरणे याबद्दल सविस्तर माहिती दिली. या प्रवेशोत्सव कार्यक्रमाला शाळेचे सर्व प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा उत्साह हा प्रकर्षाने दिसून आला.या कार्यक्रमाचे संचलन श्री कैलास सुरकुटे व श्री दिलीप देशमुख यांनी केले.

# शिक्षणाचा नवा पर्याय; अकरावीला वळसा

तुम्ही कितीही हुशार असाल, तरीही ग्रॅज्युएट नसाल तर तुमच्या हुशारीची किंमत शून्य करणारी मानसिकता गेल्या काही वर्षांत भारतीय मनामध्ये बिंबलेली आहे. शिक्षण कशासाठी घ्यायचे ते चांगल्या पगाराची नोकरी लागावी यासाठीच. मध्यमवर्गीय, सर्वसामान्य कुटुंबातील पालकांचा कल तोच असायचा. पण, पंधरावीपर्यंत शिक्षण घेण्यासाठी महाविद्यालयातील अकरावीतील प्रवेश ही पहिली पायरी असताना यंदा मात्र, वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. अकरावी प्रवेशासाठी राज्यातील महाविद्यालयातील रिक्त कोटा अद्याप भरलेला नाही. त्यातून विद्यार्थी पालकांकडून अकरावी प्रवेशाकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले आहे.

दहावीनंतर विद्यार्थी प्रवेशासाठी अकरावी-बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान या अभ्यास शाखांचा प्राधान्याने विचार करताना आढळतात. मात्र, या व्यतिरिक्त पुढील शिक्षणाचे इतरही महत्त्वाचे पर्याय उपलब्ध आहेत. सध्या काही अभ्यासक्रमांचा अपवाद वगळता अनेक अभ्यासक्रमांमध्ये पदवीची ५ वर्षे आणि त्याचबरोबर कॉम्प्युटर आणि तत्सम व्यावसायिक कोर्स केल्याशिवाय नोकरी मिळण्याची शक्यता फारच कमी असल्याने, अकरावीत प्रवेश घेऊन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे बहुसंख्य पालकांचा कल असतो.

डॉक्टर, इंजिनीयर, वकील बनण्यासाठी किमान बारावी पास होऊन पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा होत असला तरी, अकरावी प्रवेश न घेता, अन्य अभ्यासक्रमांना प्राधान्य देणारी विद्यार्थी पालक वर्गाची व्यवसायमुख मानसिकता नक्कीच पुढील शैक्षणिक धोरणात बदल घडवायला लावणारी आहे. यंदा अकरावीच्या प्रवेशासाठी राज्यभरात विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करून घेण्यात आले आहेत. त्यानुसार इयत्ता अकरावीसाठी सुमारे २१ लाख २३ हजार जागा उपलब्ध आहेत. मात्र, केवळ १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांनीच अर्ज केल्याने जवळपास ८ लाख जागा शिल्लक राहणार आहेत. पारंपरिक शिक्षण पद्धतीकडे पाठ फिरवत दहावीच्या या आठ लाख विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावीत प्रवेश न घेता अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्राधान्य देतील, असे मानायला हरकत नाही. राज्याच्या शिक्षण विभागाकडून अकरावी इयत्तेसाठी महाविद्यालयांना विद्यार्थी संख्येचा कोटा वाढवून दिला आहे. राज्यात अनेक नवीन महाविद्यालयांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे महाविद्यालयात अकरावीच्या जागा अधिक आणि प्रवेश घेणारी मुले कमी अशी स्थिती निर्माण झाली आहे.

सध्या वाढती महागाई पाहता मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांच्या पालकांची चालली आर्थिक ओढाताण दिसते. त्यामुळे पदवी घेण्यामध्ये वर्ष आणि पैसे खर्च होतात, असा त्यांचा दृष्टिकोन बनलेला आहे. दहावीनंतर २ ते ३ वर्षांत व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून हे विद्यार्थी अर्थार्जनाकडे वळतात. मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलांकडून पैशाचा आणि लवकर स्थिर होण्याचा विचार करूनच व्यावसायिक अभ्यासक्रम हा पर्याय सध्या निवडला जात आहे. काही अल्प मुदतीचे अभ्यासक्रम आहेत. ते पूर्ण केल्यानंतर मुलाची अर्थाजनासाठी मदत मिळेल, असा विचार काही पालक करतात. एमकेसीएलचे एमएससीआयटी/कोरल ड्रॉ, ॲडव्हान्स एक्सेल, फोटोग्राफी, तसेच एमएसएमई, खादी ग्रामोद्योग, सी बी कोरा ग्रामोद्योग संस्था, जन शिक्षण संस्था, कृषी विद्यापीठे, यांसारख्या संस्थामधून वर्षभर अनेक अल्प मुदतीचे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्याला पदवी शिक्षणाची गरज नाही. स्वयं रोजगार उपलब्ध होण्यास या अभ्यासक्रमांचा चांगला उपयोग होत आहे, असा मानणारा पालक वर्ग तयार होताना दिसत आहे.

# उत्तमचंद बगडीया महाविद्यालयात योग दिन साजरा



**रिसोड** : स्थानिक बगडिया महाविद्यालयांमध्ये २१जून रोजी आंतरराष्ट्रीय दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी यांच्या पुढाकाराने व संस्थेचे अध्यक्ष. उत्तमचंदजी बगडिया यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात रिसोड नगरीचे आराध्य दैवत संत अमरदास बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर सकाळी ६.३० मि ते ७.३० मि. या वेळेत आर्ट ऑफ लिविंगच्या वतीने प्रशिक्षक कालिदास इंगळे, श्याम तिवारी व डॉ. अजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली योग अभ्यास करण्यात आला. यानंतर ब्रह्मकुमारी परिवार रिसोड च्या ज्योती दीदी यांनी अध्यात्म आणि योगासन याचे मानवी जीवनामधील महत्त्व आपल्या प्रवचनातून उपस्थित मंडळींना समजावून सांगितले.

यानंतर योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये दिवाणी व फौजदारी न्यायालय रिसोड चे न्यायमूर्ती सपकाळ यांच्या हस्ते माँ सरस्वती देवीच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली, या कार्यक्रमाला सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती सपकाळ व गायकवाड तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी शेवदा काशीबाई मगनलालजी बहुउद्देशीय अल्पसंख्यांक संस्थेचे अध्यक्ष . उत्तमचंद बगडिया तथा सचिव विठ्ठलराव वसू .बद्रीनारायण तोष्णीवाल . उखळकर .ओम तोष्णीवाल अंकुश देशमुख, विवेकानंद ठाकरे , रवी अंभोरे, पतंजली योग रिसोड, आर्ट ऑफ लिविंग परिवार रिसोड, सत्र न्यायालय रिसोड पंचायत समिती रिसोड, तहसील कार्यालय रिसोड, ब्रह्मकुमारी परिवार रिसोड, डॉक्टर असोसिएशन रिसोड, मेडिकल असोसिएशन रिसोड, पत्रकार असोसिएशन रिसोड, संत अमरदास अर्बन रिसोड, समता फाउंडेशन रिसोडच्या सर्व कर्मचारी वर्ग व रिसोड नगरीतील बहुसंख्य नागरिक या योगाभ्यास कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्याकरिता या सर्वांचे मोलाचे योगदान लाभले. प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व मंडळींचे आभार मानले.(वि. प्र)

# निवृत्तीवेतन धारकांसाठी पेंशन मेळावा : २४ जून रोजी वाशिम येथे आयोजन

वाशिम, दि. २० जून (जिमाका) - वाशिम जिल्हयातील सर्व राज्य शासकिय निवृत्ती वेतन धारक/कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांना सुचित करण्यात येते की, निवृत्तीवेतन धारकांच्या समस्या/अडचणी जाणुक घेवुन त्याचे निराकरण करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय वाशिम येथे दि. २४ जुन रोजी रोजी दुपारी १२ वाजता जिल्हा कोषागार कार्यालय, वाशिम येथे पेंशन मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. तरी निवृत्तीवेतन धारक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम विजय जवंजाळ यांनी केले आहे.

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा मासिक शिबीर दौरा कार्यक्रम

वाशिम, दि. १९ जुन (जिमाका) : जिल्हयातील मोटार वाहन चालक/मालक यांच्या सोयीसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक यांचा सन २०२५ या वर्षातील माहे जुलै ते डिसेंबर २०२५ या कालवधीत मासिक शिबीर दौरा आयोजित केला आहे.

मासिक शिबीर दौऱ्यात वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, तपासणी, वाहन चालक अनुज्ञप्ती तयार करण्यात येणार आहे.

माहे जुलै २०२५ मध्ये कारंजा येथे ४ , रिसोड - ८ , मानोरा - ११ , मंगरुळपीर - १५ आणि कारंजा - १८. माहे ऑगस्ट महिन्यात कारंजा - ५ , रिसोड - ८ , मानोरा - १३ , मंगरूळपीर - १९ आणि कारंजा २१. माहे सप्टेंबर महिन्यात कारंजा येथे ४ , रिसोड - ९ , मानोरा - १२ , मंगरुळपीर - १६ आणि कारंजा १९ . ऑक्टोबर महिन्यात कारंजा येथे ६ , रिसोड - १० , मानोरा - १४ , मंगरुळपीर - १७ व कारंजा - २४ . नोव्हेंबर महिन्यात कारंजा येथे ४ ,रिसोड - ७ ,मानोरा - ११ , मंगरुळपीर- १४ आणि कारंजा १८ , डिसेंबर महिन्यात कारंजा येथे ५ रोजी, रिसोड - ९ , मानोरा - १२ , मंगरुळपीर - १६ आणि कारंजा येथे १९ डिसेंबर रोजी हे शिबीर आयोजित केले आहे.

# सामाजिक बंदोबस्ताच्या माध्यमातून आम्हाला घडते ईश्वर दर्शन

## पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या भावना : कधीच ताण जाणवत नाही





**रिसोड** शहरातील अथवा तालुक्यातील कोणताही सण , उत्सव , रॅली , मोर्चे , व्हीआयपी दौरे म्हटलं की पोलीस बंदोबस्त आलाच पोलिसाशिवाय आज कोणताही सामाजिक कार्यक्रम निर्विघ्न पार पडणे शक्य नाही त्यातच अनेक सामाजिक उत्सव असो जसे की शहरातून जाणारे अनेक पालखी सोहळे , अनेक समाजांचे उत्सव त्यासाठी सुमारे अनेक दिवसापासून पोलीस बंदोबस्ताची तयारी सुरू करतात त्यामध्ये आत्ताच काही दिवसांपूर्वी श्री संत गजानन महाराज यांचा पालखी सोहळा रिसोड येथून श्रीक्षेत्र पंढरपूर इकडे प्रस्थान झाला यावेळी रिसोड पोलिसांनी आठ दिवसांपूर्वीच बंदोबस्ताची तयारी सुरू केली होती पालखी मार्ग आणि मुक्कामासह हजारो वारकऱ्यांना कोणताही त्रास होता कामा नये यासाठी पोलिसांनी चोख नियोजन केले होते पालखी शहरात दाखल झाल्यानंतर १२ - १२ तास पोलिसांचा खडा पहारा तैनात करण्यात आला होता एरवी अन्य बंदोबस्ता वेळी वैतागलेले पोलीस अधिकारी कर्मचारी मात्र या बंदोबस्त वेळी उत्साहात कर्तव्य बजावत होते पंढरपूरला विठू माऊलीच्या दर्शनाला जाता येत नाही मात्र या बंदोबस्ताच्या माध्यमातूनच आम्हाला विठू माऊली चे दर्शन घडते अशी प्रतिक्रिया पोलिसांनी बोलताना दिली .

### ही तर ईश्वराची सेवा ....

पोलीस कर्मचाऱ्यांपैकी काहीजणाची तर अनेक बंदोबस्तावेळी आजारी असतात पण अनेक बंदोबस्त चुकवायचा नाही या भावनेने कर्तव्यावर हजर राहतात तर अनेक सण उत्सवातून भक्तिमय वातावरणात सर्वसामान्यांची सेवा करण्याची आम्हाला संधी मिळते एका प्रकारे ही तर ईश्वर सेवा करण्याची संधी आम्हाला मिळत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले .

### कुठलाही बंदोबस्त त्रासदायक नसतो .....

पोलीस कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार कुठलाही बंदोबस्त हा आमच्यासाठी कधीच त्रासदायक नसतो आम्ही गेल्या अनेक वर्षापासून अनेक सण-उत्सव बंदोबस्तासाठी आतुर असतो रिसोड पोलीस स्टेशनचे अनेक कर्मचारी गेल्या २० - २५ वर्षापेक्षा अधिक काळापासून पोलीस खात्यात कार्यरत आहेत १२ तासाची ड्युटी असली तरी आनंदाने आम्ही बंदोबस्त करतो या बंदोबस्ताचा कधी स्थान आम्हाला जाणवत नाही असे पोलिसांनी सांगितले .

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# खोट्या बातम्यांना कायद्याने आळा घालणार

## कर्नाटक सरकार आणणार नवा कायदा

**बंगळूरू :** सोशल मीडियाद्वारे फेक बातम्या पसरवण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. या



पसरणाऱ्या खोट्या बातम्यांना आळा घालण्यासाठी आता कर्नाटकातील काँग्रेस सरकार एक नवीन कायदा आणत आहे. यामध्ये खोट्या बातम्या पसरवणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपर्यंतची शिक्षा आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने अलीकडेच एक विधेयक मांडले आहे. खोट्या बातम्या पसरवणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपर्यंतची शिक्षा आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. कर्नाटक सरकारने प्रस्तावित केलेल्या कायद्यात म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने बनावट बातम्या किंवा चुकीची माहिती पसरवण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्याविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल.

# जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला रिसोड नगर परिषद बांधकाम विभागाची केराची टोपली

**वाशिम – जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी बुवनेश्वर एस. यांनी जनतेच्या तक्रारीचे निवारण होण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जाऊन त्या तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्याची मोहीम हाती घेतली आहे.**

त्यानुसार १८ जून २०२५ रोजी रिसोड तालुक्यातील जनतेच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी तहसील कार्यालयात आल्या व जनतेच्या समस्या व त्यांनी केलेल्या तक्रारी ऐकून घेतल्या याप्रसंगी त्यांनी प्रशासनाच्या प्रत्येक विभागातील अधिकार्यांना बोलवून त्यांच्या विभागाशी संबंधीत असलेल्या जनतेच्या तक्रारी सोडविण्याचे निर्देश दिले १८ जून रोजी पार पडलेल्या सभेमध्ये शहरातील इंदिराबाई पांडे ले-आऊट मधील नागरीकांनी मा. जिल्हाधीकारी यांची भेट घेऊन इंदीराबाई पांडे ले-आऊट मधील २ रस्त्यावर झालेल्या अतिक्रमण संदर्भात माहिती दिली

या प्रसंगी तेथील रहिवाण्यांनी जिल्हाधीकारी यांना सांगीतले की इंदिराबाई पांडे ले-आऊट मधील सन्मान हॉटेल पासून ३० फुटाचा रस्ता तसेच जिरवणकर यांच्या किराणा दुकानामागुन १५ फुटाचा रस्ता अतिक्रमीत झाला असुन त्यामुळे या परीसरातील नागरीकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात तेथील रहिवाश्यांनी ११ मार्च २०२२, १४ ऑक्टोबर २०२४, १५ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी व रिसोड नगर परीषद प्रशासनाला निवेदने दिली. परंतु गेल्या ४ वर्षापासून या संदर्भात न.प. प्रशासनाने कोणतीच अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली नाही असे जिल्हाधिकारी यांना सांगीलतले त्यामुळे मा. जिल्हाधीकारी यांनी न.प. प्रशासनाला सदर दोन्ही रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत निर्देश दिले. परंतु अद्यापही या बाबत नगर परीषदेच्या बांधकाम विभागाने कोणतीही दखल न घेतल्यामुळे मा. जिल्हाधीकारी यांच्या निर्देशाला केराची टोपली दाखवीली आहे.

# भा.मा. शाळा चिंचांबाभर येथे प्रवेशोत्सव साजरा




**रिसोड:** भारत माध्यमिक शाळा चिंचांबा भर येथे आज दि २३ जून २०२५ रोजी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला, या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक एम.डी.शिंदे प्रमूख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समिती चे उपाध्यक्ष दिनकरराव सानप, अशोक राव सानप सरपंच तसेच ज्ञानेश्वर साखरे व अमोल सानप हे उपस्थित होते.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात आनंददायी पद्धतीने स्वागत करण्यात आले, त्याचप्रमाणे वर्ग ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांना पुस्तकाचे वाटप करण्यात आले, वर्ग ५ वि मधील नवीन प्रविष्ट विद्यार्थ्यांना भेट वस्तु व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.एस. सानप यांनी केले. या कार्यक्रमा प्रसंगी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.सानप यांनी तर आभार प्रदर्शन चौहान यांनी केले. श.प्र.

# कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा

## कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे प्रतिपादन



**शिर्डी:** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज भरायलाच हवे, असे ते म्हणालेत. तर कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल, असे विधान करत त्यांनी या विषयावर पुन्हा एकदा चर्चा सुरू केली आहे. कोपरगाव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना कोकाटे यांनी राज्यातील कृषी आणि राजकीय घडामोडींवर भाष्य केले.

महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत येऊन सहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटला, मात्र, कर्जमाफीबाबत ठोस घोषणा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्गातून सरकारविरोधात नाराजी सूर उमटत आहे. या पार्श्वभूमीवर कोकाटे यांच्या विधानाकडे विशेष लक्ष वेधले जात आहे.

माणिकराव कोकाटे यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत विचारले असता कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल. शेतकऱ्यांनी कर्ज भरलीच पाहिजेत. मात्र कर्जमाफी संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे त्यांनी म्हटले आहे.

### बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाईचा इशारा

कृषीमंत्री कोकाटे यांनी बोगस बियाणे व कीटकनाशकांच्या विक्रीविरोधातही ठाम भूमिका घेतली. बोगस बियाणे आणि औषधांसंदर्भात ज्या कृषीसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल, त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

### शेतीत सरकारी भांडवली गुंतवणुकीवर भर

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले, सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे. यासाठी पुढील पाच वर्षांत सरकार २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

परदेशी पातळीवर मिळणाऱ्या सवलती आणि सुविधा भारतीय शेतकऱ्यांनाही मिळाल्या पाहिजेत. सरकारी गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# पॉलीटेक्निक अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर करणास मुदतवाढ

मुंबई, दि.१६ : राज्यातील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमधील पदविका (पॉलीटेक्निक) प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद आणि प्रमाणपत्रे मिळण्यात होणारा उशीर लक्षात घेता, विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवू नये म्हणून अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. या निर्णयानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत, आता २६ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर वेळापत्रक, प्रवेश प्रक्रियेचा तपशील आणि अर्ज सादरीकरणासाठी आवश्यक माहिती https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध

# मंत्री नितेश राणेंचे मुख्यमंत्रीपदाबाबत मोठं विधान!

**वर्सोवा खाडी:** राज्यात महायुतीची सत्ता आल्यापासून मुख्यमंत्री पदाबाबत अनेक विधाने नेतेमंडळी करताना दिसली होती. अजूनही मुख्यमंत्री पदाविषयीची वक्तव्य महायुतीमधील नेतेमंडळी करत आहेत. अशातच भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे मुख्यमंत्रीपदादाबाबत मोठं विधान केले आहे. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे हे वर्सोवा खाडीजवळील स्थानिक मच्छीमारांची भेट घेऊन



त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी त्यांनी देवाभाऊ हेच पुढील १०० वर्षे मुख्यमंत्री व्हावे, अशी प्रार्थना करण्याचे मच्छिमार बांधवांना सूचवले आहे. मी राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून आलेला आहे. आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत.

# आषाढी एकादशी वारीसाठी दिंड्यांना २.८ कोटींचे अनुदान

मुंबई, दि. २० : आगामी आषाढी एकादशी वारी करिता तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या एकूण १४०० दिंड्यांना प्रति दिंडी २०,००० रुपये प्रमाणे २ कोटी ८० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या संदर्भातील १४ जून आणि १७ जून २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

# वाहनांच्या पाठीमागे बसविलेल्या सायकल कॅरीअरवर कारवाई नाही; परिवहन आयुक्तांचे परिपत्रक

**मुंबई, दि. १६ : वाहनांच्या पाठीमागे इतर वाहनांना कोणत्याही प्रकारे अडचण, अडथळा निर्माण होणार नाही, अशा प्रकारे बसविण्यात आलेल्या सायकल कॅरीअरद्वारे वाहून नेत असल्यास, अशा वाहनांवर यापुढे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येऊ नये, असे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.**

पर्यावरणास अनुकूल, व्यायामाचे एक साधन त्याचप्रमाणे कोणत्याही भागाच्या शेवटच्या स्थानापर्यंत सहज जाता येते. याकरीता जगातील अनेक देशांमध्ये बरेचजण वाहनाचा वापर न करता सायकलचा वापर करत असतात, याकरीता बरेचसे वाहन धारक आपल्या वाहनाच्या पाठीमागे सायकल कॅरीअर बसवून त्याचा वापर सायकल वाहून नेण्यासाठी करत असतात. आपल्या देशातही वाहनधारक वाहनाच्या पाठीमागे सायकल कॅरीअर बसवून सायकल वाहून नेताना आढळतात. मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या नियमात वाहनांच्या पाठीमागे सायकल कॅरीअर लावण्याबाबत कुठेही प्रतिबंध नाहीत, असे असतानादेखील अशा वाहनांवर परिवहन विभाग तसेच पोलीस विभाग यांच्या अंमलबजावणी पथकांमार्फत कारवाई केली जात असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

यापुढे अशा सायकल कॅरीअरवर कुठलीही कारवाई होणार नाही, परिपत्रकात नमूद केले आहे.

# मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना

वाशिम, दि. १९ जून (जिमाका) - साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. वाशिम जिल्हा कार्यालय अंतर्गत वाशिम जिल्हयातील मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. तरी या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणीक वर्षामध्ये १०वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे. गरजु विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, गुणपत्रिका, बोनाफाईड, दोन फोटो, आधार कार्ड, बँक पासबुक इ. कागदपत्रासह दि. १७/०७/२०२५ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, वाशिम येथे कार्यालयीन वेळेत येऊन प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे.

# रिसोड नगर परिषद क्षेत्रातील शासकीय जागा नियमानुकूलचा मार्ग मोकळा

**रिसोड**

रिसोड नगर परिषद हद्दीतील शासकीय जागा ह्या नियमाकुल करून संबंधित लोकांच्या स्वाधीन करावी यासाठी गेली अनेक दिवसापासून इंदिरा नगर,रामनगर,गौस पुरा , गजानन नगर , जिजाऊ नगर, कैलास नगर समता नगर माणुसकी नगर येथील शासकीय जागेवर राहणारे नागरिक हे शासकीय योजनेपासून वंचित होते त्यामागील कारण की यांचे जागा ह्या नियमकुल नव्हत्या यासाठी गेली अनेक दिवसापासून या भागातील नागरिक सातत्याने निवेदने आंदोलने करत होते त्यांच्या या आंदोलन व निवेदनाला



या संदर्भात या भागातील नागरिकांची मागणी रास्त होती या संदर्भात नगरपरिषद गेली अनेक दिवसापासून योग्य ती प्रक्रिया करत होती. यामुळे आता भूमी अभिलेख कार्यालया कडे फी भरल्यानंतर जागा नियमकुल करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत.

**सतीश शेवदा**
**मुख्याधिकारी न प रिसोड**



आमच्यासाठी ही सर्वात महत्त्वाची वेळ आहे या निर्णयामुळे आम्ही सर्व नागरिक खूप दिवसांनी या दिवसाची वाट पाहत होतो आमची जागा आमच्या नावावर होणे ही खूप महत्त्वाचे आहे.

**शेख सरवर,**
**गौस पुरा रहिवाशी**



या संदर्भात गेली अनेक वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करत आहोत. नगरसेवक नात्याने माझे कर्तव्य होते. या भागातील नागरिकांना सुविधा पुरवणे हे अत्यंत गरजेचे होते. जागा नियमकुल संदर्भात गेल्या अनेक वर्षापासून या भागातील नागरिकांची मागणी आता पूर्ण होण्याच्या दिशेने काम सुरू झाले आहे.

**संतोष चराटे,**
**नगरसेवक**



सदर काम मार्गी लागल्यानंतर आमचे स्वप्न पूर्ण होणार. यामुळे आमच्या भागातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे .यासाठी या भागातील नागरिकांसह नगरसेवकांनी मोलाचे योगदान दिले आहे.

शेख साबेर
**इंदिरानगर**
**रहिवासी**



प्रभाग ०६ मधील इंदिरानगर गौस पुरा रामनगर या भागातील शासकीय जागा नियमाकुळ करण्यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासन अधिकारी सतिष शेवदा यांनी मोजणीचे पैसे भरल्यामुळे भुमीअभिलेख विभाग मोजणी करणार असल्याने आमची मागणी पूर्ण होणार.

**सदिप गुंजकर,**
**राम नगर रहिवाशी**



नगर परिषद व आमचे नगर सेवक यांनी जो काही निर्णय घेतला त्या निर्णयामुळे आमच्या भागातील सर्व नागरिकात आनंदाचा वातावरण आहे आमच्या प्रभागातील नगरसेविका सौ मिरा संतोष च-हाटे यांची महत्त्वाची भूमिका आहे.

**सय्यद अफजल,**
**इंदिरानगर रहिवासी**

### नप ने भरली भूमी अभिलेखला फी

अखेर यश आले असून नगरपरिषद ने जागा नियमकुल कन्या संदर्भात मोजणीसाठी शासकीय फी भरली असून लवकरच आता या भागातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे जागा नियमाकुल करण्यासंदर्भात भूमी अभिलेख कार्यालयात फी भरल्यानंतर या संदर्भात हालचालींना वेग आलेला आहे यामुळे आता या भागातील नागरिकांना त्यांचे हक्काचे घर जागा मिळणार असून लवकरच आता या भागातील नागरिक हे शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकतील.

# मंत्र्यांकडून मर्जीतील अधिकाऱ्यांचे लाड

**मुंबईः** राज्य सरकारमधील मंत्र्यांकडून मर्जीतील अधिकाऱ्यांचे सुरु असलेले लाड बंद



करण्यासाठी आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआरएमधील मेहरबान अधिकाऱ्यांवर पहिली कारवाई केली असून एसआरएमधील कार्यकारी अभियंता मिलिंद वाणी यांची अखेर जलसंपदा खात्यात बदली करण्यात आली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, मिलींद वाणी हे जलसंपदा खात्यातील मूळ अधिकारी असून देखील जवळपास १७ वर्ष प्रतिनिधीवर बाहेर काम करत आहेत वास्तविक प्रतिनियुक्तीवर पाच ते सात वर्ष काम करणे अपेक्षित आहे पण हे सारे मध्येच वाणी हे तब्बल सात वर्षे कार्यरत असून जलसंपदा विभागाच्या मूळ विभाग सोडून १९ वर्ष इतर विभागात काम करत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गृहनिर्माण विभागाच्या अंतर्गत एसआरए विभाग येथे अनेक अधिकारी दीर्घकाळ प्रतिनियुक्तीवर आहेत, यामुळे मूळ विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहेअखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाणी यांची उचलबांगडी केली असून एस आर ए मधून त्यांना थेट विभाग असलेल्या जलसंपदा विभागात जावे लागणार आहे.

### मुख्यमंत्री ॲक्शन मोडवर

● गृहनिर्माण विभागांमध्ये विशेषतः एसआरए आणि म्हाडा मध्ये अनेक इतर विभागातून प्रतिनियुक्तीवर अधिकारी आले आहेत, एकदा आले की ते परत जातच नाहीत अशी स्थिती आहे यामुळे अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. वाणींसारखे इतर अधिकारी अनेक आहेत की जे प्रतिनियुक्तीवर आले आहेत आणि म्हाडा आणि एस आर ए मध्येच कार्यरत आहे यामुळे अशा लोकांवर देखील कारवाई कधी करणार? असा सवाल आता विचारला जात आहे.

# भारत माध्यमिक शाळेत जागतिक योग दिन साजरा



रिसोड : रिसोड येथील भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये २१ जून २०२५ शनिवारला जागतिक योग दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी रिसोड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बि.एल. कोकाटे उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य संजय भांडेकर,उपप्रचार्य संजय शर्मा,पर्यवेक्षक ज्ञानेश्वर थोरात तसेच शाळेचे सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. सर्वांनी सकाळी ६:३० वा उपस्थित राहून जवळपास एक तास भर योगाचा सराव केला. यामध्ये प्रामुख्याने प्राणायाम व इतर महत्त्वाचे योगा व ध्यान यांचा समावेश होता. या संपूर्ण योगा सरावाचे संचलन शाळेचे क्रीडा शिक्षक श्री कैलास सुरकुटे व विज्ञान शिक्षक श्री पुरण धुमाळ यांनी पार पाडले. श. प्र.

# भा. मा. शाळा चिंचांबापेन येथे शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत व पुस्तकाचे वाटप




आज दिनांक २३ जून २०२५ रोजी भारत माध्यमिक शाळा, चिंचाबा पेन येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने शाळेचा पहिला दिवस अत्यंत आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. जी. एन. देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात आले.

इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

इयत्ता ५ वी ते १० वी मधील सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांना गोड खिचडीचे स्वादिष्ट जेवण देण्यात आले, जे त्यांनी आनंदाने स्वीकारले.

यावेळी शाळेतील नियम, शिस्त, स्वच्छता व नियमित उपस्थितीचे महत्त्व या विषयांवर विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

या विशेष प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, नव्या पुस्तकांचा सुगंध आणि शाळेतील शिस्तबद्ध वातावरण यामुळे नव्या शैक्षणिक वर्षाची सुंदर सुरुवात झाली.

भारत माध्यमिक शाळा, चिंचाबा पेन कडून सर्व विद्यार्थ्यांना नव्या वर्षासाठी मनःपूर्वक शुभेच्छा

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका निदेशकांना न्याय

मुंबई, दि. २० : ज्या शिल्प निदेशकांनी ५ वर्षापेक्षा जास्त काळ विभागामध्ये कार्य केले आहे, त्यांची परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात यावे, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकांना दिले आहेत. माजी मंत्री शोभाताई फडणवीस यांनी तासिका निदेशकांना नियमित करण्याबाबत मंत्री श्री. लोढा यांना पत्राद्वारे विनंती केली होती. यानंतर मंत्री श्री. लोढा यांनी या पत्राची तातडीने दखल घेत, संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक चर्चा करून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

# मुलांच्या शिक्षणावर होणाऱ्या परीणामुळे तो निर्णय रद्द करावा

### रिसोड शहरातील नागरीकांचे न.प.ला निवेदन

रिसोड : नगरपरिषद ने नगरपरिषद उर्दू शाळेमध्ये भाजीपाला व अन्य दुकाने लावण्याचा निर्णय घेतला आहे. सदर निर्णयामुळे लहान मुलांच्या शिक्षण व भविष्यावर परिणाम होऊ शकतो. यामुळे सदर निर्णय रद्द करावा अशी मागणी दिनांक २३ जून रोजी स्थानिक नागरिकांनी नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की रिसोड नगर परिषदेने २१ जून रोजी रिसोड शहरातील नगरपरिषद उर्दू शाळेमध्ये प्रांगणात भाजीपाला तथा अन्य विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून देऊन त्याची आखणी केली आहे. आंबेडकर चौक ते लोणी फाटा या दरम्यान रस्त्यामध्ये असलेली दुकाने ही नगरपरिषद उर्दू शाळेच्या



प्रांगणात भरवण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे . सदर दुकाने जर लागली तर लहान मुलांच्या भविष्याचा प्रश्न उद्भवतो . यामुळे लहान मुलांच्या भवितव्या साठी याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे निवेदन देताना इरफान कुरेशी, अकबर बागवान, शेख अकबर, फैय्याज अहमद, फतरू भाई, शेख अजीज, रियाज खान, तैवाज खान, मोहम्मद खालेद, जोरावर खान, खान शहरात्त आधी उपस्थित होते यावर मुख्याधिकारी यांना विचारले असता ते म्हणाले की, शहरातील मुख्य रस्त्याचे वाहतूक सुरळीत करण्याची नागरिकांची मागणी होती आणि रस्ता सुद्धा नवीन झाला आहे तसेच या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वरदळ असल्याने क्षेडखानी चे प्रकार वाढत आहे आणि फळ आणि भाजी विक्रेत्याची प्रस्तावित जागा सुद्धा नगरपालिकेच्या मालकीची आहे विद्यार्थ्याच्या शिक्षणावर याचा कोणताही परिणाम होणार नाही तसेच उर्दू शाळेची इमारत जीर्ण झालेली आहे विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता लक्षात घेता पर्यायी जागेची निवड सुरू आहे नागरिकाच्या मागणीवरून हा निर्णय घेतला असून जनतेने याला बळी पडू नये असे आवाहन सुद्धा करण्यात आले. ता. प्र.